मे.महाराष्ट्र एक्स सर्विसेस कॉर्पोरेशन लि. पुणे (मेस्को) यांचे सामान्य रूग्णालय, औंध, पुणे करीता दिलेल्या कंत्राटी सुरक्षा सेवा प्रलंबित देयक मंजूर करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१८/प्र.क्र. ८४ / आरोग्य -३अ
ए विंग , १० वा मजला, गो.ते. रूग्णालय संकूल इमारत
लो.टि. मार्ग , मुंबई- ४०० ००१
तारीख: २७ मार्च, २०१८

वाचा -

१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५
२) सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर) यांचे क्रमांकः संआसे/टे-५/कक्ष-३/मेस्को/कं.सु.र./सारू, औंध, पुणे/ ३४५३८-३९/ १७. दि. १६ ऑक्टोबर, २०१७ चे पत्र

प्रस्तावना -

सामान्य रूग्णालय औंध, जिल्हा पुणे करीता महाराष्ट्र एक्स सर्विसेस कॉर्पोरेशन लि. पुणे (मेस्को) या संस्थेने माहे नोव्हेंबर, २०१५ ते माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत कंत्राटी सुरक्षा सेवा पुरविली होती. सदर सेवेच्या उक्त कालावधीचे कंत्राटी सुरक्षा सेवा देयकांना एक वर्षाहून अधिक कालावधीकरीता प्रलंबित असून त्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

महाराष्ट्र एक्स सर्विसेस कॉर्पोरेशन लि. पुणे (मेस्को) या संस्थेने सामान्य रूग्णालय, औंध, जिल्हा पुणे या रूग्णालयास पुरविलेल्या कंत्राटी सुरक्षा सेवेचे माहे नोव्हेंबर, २०१५ ते जून, २०१६ या कालावधीकरीता रू. २६,०७,२९३/- (अक्षरी रू. सव्वीस लाख सात हजार दोनशे त्र्याण्णव फक्त), माहे जुलै, २०१६ ते डिसेंबर-२०१६ या कालावधीतील देय रक्कम रू.२०,४६,५९४/- व नोव्हेंबर-२०१५ ते डिसेंबर, २०१५ व एप्रिल- २०१६ च्या फ़रकाची एकत्रित रक्कम रू.४०,०२८/- असे एकूण रू. २०,८६,६२२/- (अक्षरी रू. वीस लाख शह्याऐंशी हजार सहाशे बावीस फ़क्त) इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर देयकावरील खर्च सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून मागणी क्र. - आर-१, मुख्य लेखाशिर्ष २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ११०- रूग्णालये व दवाखाने, (०१) (०१) मुसफ़ल क्षेत्रातील अध्यापनेत्तर रूग्णालये व दवाखाने (२२१० ०१४६) १०- कंत्राटी सेवा या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

३. सदर बाबीसाठी प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, औंध, जिल्हा पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सदर रक्कम अदा करण्यास उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला, उपविभाग - एक, अ.क्र.६, नियम क्रमांक - ४० अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार त्यात नमूद अटींच्या अधिन राहून निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०३२७१६३८४३१४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.27 18:50:02 +05'30'

(रा. शा. कौरते)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई .
३) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) निवासी लेखाधिकारी, मुंबई
५) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
६) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, औंध, पुणे.
७) कोषागार अधिकारी, पुणे
८) प्रशासकीय अधिकारी, पुणे
९) महाराष्ट्र एक्स सर्व्हिसेस कॉर्पोरेशन लि. पुणे
१०) वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
११) कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१२) निवडनस्ती (आरोग्य-३ अ)